भारतीय ज्ञान परंपरा आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

डॉ. रमेश टीकाराम बागडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री संताजी कला व विज्ञान महाविद्यालय, पालांदूर
Email - rtbagade167@gmail.com
मो. नं. – 9420619167

Crossref DOI -

सारांश :

भारतीय ज्ञान परंपरा ही अत्यंत समृद्ध अशी आहे. ज्ञान आणि विज्ञान, लौकिक व परलौकिक, कर्म आणि धर्म, तसेच भोग व त्याग यांचा अद्भुत समन्वय भारतीय ज्ञान परंपरेत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020मध्ये भारतीय ज्ञान परंपरेवर भर देण्यात आलेला आहे. संस्कारासोबतच मातृभाषा आणि शारीरिक शिक्षणाचाही सांगोपांग विचार या नव्या शैक्षणिक धोरणात करण्यात आलेला आहे. प्राचीन काळी गुरूंना सर्वश्रेष्ठ समजले जात असे. नव्या धोरणातही केंद्रस्थानी शिक्षक आहेत. सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडवण्यासाठी त्यांना शिक्षकांकडूनही निःस्वार्थी, त्यागी व सर्वज्ञानी असण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेचे जगभरात जे स्थान प्राचीन काळी होते, तेच परत मिळविण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण प्रयत्नशील आहे.

बीजशब्द : भारतीय ज्ञान परंपरा, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, कर्म-धर्म, भोग-त्याग, मातृभाषा, शारीरिक शिक्षण.

प्रस्तावना :

भारतीय ज्ञान परंपरा ही अत्यंत समृद्ध आणि अद्वितीय अशी आहे. भारतीय ज्ञान परंपरेत ज्ञान व विज्ञान, लौकिक व परलौकिक, कर्म व धर्म, तसेच भोग व त्याग यांचा अद्भुत समन्वय आहे. प्राचीन अशा ऋग्वेद काळापासून भारतीय शिक्षण पद्धतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक व बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथज्ञानासोबतच शारीरिक शिक्षणाचे महत्त्व भारतीय ज्ञान परंपरेतून अधोरेखित होते.

भारतात जगप्रसिद्ध अशी ज्ञान केंद्रे अर्थात विद्यापीठे होती. तक्षशिलेची स्थापना श्रीरामाचा भाऊ भरत याने केली व आपला मुलगा तक्षला तिथे वसविले. पुढे आक्रमकांनी तक्षशिला नष्ट केली आणि ग्रंथालय जळले, ज्यात असंख्य संस्कृत ग्रंथ जळाले. त्यानंतर शिक्षाविद आचार्यांनी नालंदा विद्यापीठाची स्थापना केली. पुढे नालंदाही परकीयांनी उद्ध्वस्त केले. या विद्यापीठामध्ये भारतीय ज्ञान परंपरा, वेद, संस्कृत, साहित्य व वैज्ञानिक पद्धतीनुसार अभ्यासले गेले आणि ही विद्यापीठे योग आणि आयुर्वेद विज्ञानाची प्रयोगशाळा व केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली. भारताने नेहमीच जगाला आध्यात्मिक बंधुता, योग व आयुर्वेदाने ज्ञान दिले आहे. याचे अनुकरण आजही जागतिक समुदाय करत आहे. नुकत्याच लागू करण्यात आलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये भारतीय ज्ञान

परंपरेवर भर देण्यात आलेला आहे. संस्कारासोबतच मातृभाषा आणि शारीरिक शिक्षण यांचाही सांगोपांग विचार या नव्या शिक्षण धोरणात करण्यात आलेला आहे.

विषय विवेचन :

प्राचीनकाळी गुरुकुल शिक्षण प्रणाली होती. ब्रह्मचर्याचे पालन करीत शिष्य अठरा विद्या, सहा वेदांगे, चार वेद ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, चारउपवेद, आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, शिल्पवेद, मीमांसा, न्याय, पुराण आणि धर्मशास्त्र असे सर्व प्रकारचे ज्ञान प्राप्त करीत. उदरनिर्वाहासाठी कोणतीही अडचण येत नसे आणि प्रौढावस्थेत पोचेपर्यंत ते आपल्या विषयात पारंगत झालेले असत. अशा भारतीय शिक्षण व्यवस्थेत अध्यापन करणारे आचार्य हे त्यागी, संपूर्ण कुशल व आर्थिक मोहापासून दूर असणारे असत. तेव्हा शिक्षण हे व्यवसायाचे आणि कमायचे साधन मानले जात नव्हते. वायुपुराणात असा उल्लेख आहे की गुरुरूपी तीर्थाचे दर्शन घेतल्याने यश मिळते व ते सर्व तीर्थक्षेत्रात श्रेष्ठ आहे. प्राचीन भारतीय सनातन ज्ञान परंपरा खूप समृद्ध होती आणि धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांचा समावेश असलेल्या व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित करणे हा त्याचा उद्देश होता. जेव्हा संपूर्ण जग अज्ञानाच्या अंधारात भरकटत होते, तेव्हा संपूर्ण भारतातील ऋषिमुनी सर्वोच्च ज्ञानाचा प्रसार करीत मानवाला पशुत्वापासून मुक्त करून त्याला उत्तम संस्कारांनी सुसज्ज करून पूर्ण संस्कारी मानव बनवित होते.

प्राचीन शिक्षण प्रणालीत ज्ञान परंपरा आणि प्रथा या मानवतेला पोषक होत्या. भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी, उज्जयिनी, काशी आदी ठिकाणी शिक्षण आणि संशोधनाची जगप्रसिद्ध केंद्रे होती आणि अनेक देशांतून विद्यार्थी ज्ञान संपादन करण्यासाठी येत असत.

वैदिक काळखंडात स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात भारताची कामगिरी उल्लेखनीय अशी होती. मैत्रेयी, ऋतंभरा, अपाला, गार्गी आणि लोपामुद्रा इत्यादी स्त्रियांची नावे त्यांच्या बुद्धिमत्तेने जगप्रसिद्ध झाली होती. बोधायन, कात्यायन, आर्यभट्ट, चरक, कणाद, वराहगिरी, नागार्जुन, अगस्त्य, भर्तृहरी, शंकराचार्य, स्वामी विवेकानंद इत्यादी अनेक महापुरुषांनी भारतभूमीवर जन्म घेऊन भारतीय ज्ञान परंपरा समृद्ध करण्यात अतुलनीय योगदान दिले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 संपूर्ण देशभरात नुकतेच लागू झाले आहे. त्यानुसार 2040 पर्यंत भारताची शिक्षण प्रणाली कोणत्याही सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देईल. एकविसाव्या शतकातील हे पहिले शैक्षणिक धोरण आहे, ज्याचे उद्दिष्ट आपल्या देशाच्या विकासासाठी आवश्यक गरजा पूर्ण करणे आणि एकविसाव्या शतकातील शिक्षणाची महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य करणे, तसेच भारताच्या परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांचा पाया राखणे आहे.

प्राचीन काळी अध्यापन मुख्यतः तोंडी असायचे. विद्यार्थी वर्गास शिकविले जाणारे विशिष्ट विषय लक्षात ठेवायचे आणि मनन करायचे. नम्रता, सत्यता, शिस्त, स्वावलंबन आणि सर्वांसाठी आदर या मूल्यांचे अधिष्ठान भारतीय ज्ञान परंपरेला आहे. त्याच पायावर आधारित ही नवीन शिक्षण प्रणाली आहे. मानव, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील समतोल राखण्याचा प्रयत्न करणारी भारतीय परंपरा विद्यार्थ्यांना शिकविले जाणे आवश्यक आहे. वेद आणि उपनिषदांमध्ये मान्य केलेल्या तत्त्वांचे अध्यापन केल्यास व्यक्ती स्वतःसोबतच स्वतःचे कुटुंब आणि

समाजाप्रती कर्तव्य पार पाडू शकेल, अशी योजना आखण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शिक्षणासोबतच शारीरिक विकासावरही भर दिला गेला आहे. विष्णुपुराणानुसार कर्म तेच आहे जे बंधनातून मुक्त करते आणि विद्या आहे जी मुक्तीचा मार्ग दाखविते. हे तत्त्व स्वीकारून भारतीय परंपरेत विद्यापीठे व गुरुकुलांमध्ये शिक्षण दिले जायचे. घरोगरी मंदिरे, शाळा, गुरुकुलांमध्ये मूल्यांसह स्वदेशी शिक्षण दिले जात होते. या सर्वांचा विचार नव्या शैक्षणिक धोरणात केलेला आहे.

प्राचीन काळी गुरूंना सर्वश्रेष्ठ समजले जात असे. सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत होत असलेल्या मूलभूत बदलांच्या केंद्रस्थानी शिक्षक नक्कीच असले पाहिजेत. या धोरणामुळे प्रत्येक स्तरावरील शिक्षकांना समाजातील सर्वात आदरणीय व उदात्त सदस्य म्हणून सन्मान मिळेल. आपल्या पुढच्या पिढीला खऱ्या अर्थाने आकार देणारे हे शिक्षण आहे. या धोरणांच्या माध्यमातून शिक्षकांना त्यांचे काम प्रभावीपणे करता यावे यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठी शक्य ते सर्व पायले उचलले जात आहेत. प्रत्येक स्तरावर शिक्षक या पेशातील उत्तम व्यक्तींची निवड करण्याची योजना आहे. त्यासाठी त्यांचे जीवनमान, सन्मान, प्रतिष्ठा, स्वायत्तता सुनिश्चित केली जाईल. या धोरणाचा उद्देश दया, संवेदनशीलता, लवचिकता, धैर्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, कल्पनाशक्ती व नैतिक मूल्ये असणारे आणि सर्वप्रकारे समावेशक समाजाच्या निर्मितीसाठी अधिक चांगले योगदान देऊ शकतील असे चांगले मनुष्य विकसित करणे हा आहे.

भारतीय ज्ञान परंपरा आणि NEP 2020 यांचा संबंध :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे मुख्य उद्दिष्ट भारताला समतादृष्टित, ज्ञानदृष्टित व गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेकडे नेणे हे आहे. भारतीय संस्कृती, ज्ञान परंपरा व मूल्यांशी जोडलेले शिक्षण देतानाच आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन व कौशल्य विकासावरही भर देण्यात आला आहे.

1. भारतीय भाषांना महत्त्व :

NEP 2020 मध्ये भारतीय भाषांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शक्य असेल तर किमान इयत्ता पाचवीपर्यंत व शक्यतो इयत्ता आठवी व त्यापुढे मातृभाषा, स्थानिक भाषा किंवा प्रादेशिक भाषेत शिक्षण देण्याची शिफारस करण्यात आली आहे. विज्ञान व गणितासाठी द्विभाषिक अध्ययन साहित्य विकसित करण्यावरही भर आहे. यामुळे भारतीय भाषांच्या संवर्धनाला चालना मिळते.

2. भारतीय ज्ञानप्रणालीचा अभ्यास :

भारतीय ज्ञानप्रणालीमध्ये पारंपरिक ज्ञान व आधुनिक संशोधन यांचा संवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिक्षण मंत्रालयाच्या Indian Knowledge Systems Division ची स्थापना ऑक्टोबर 2020 मध्ये करण्यात आली. तिचे उद्दिष्ट भारतीय ज्ञानप्रणालीवर आंतरविद्याशाखीय व बहुविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन देणे, त्याचे दस्तऐवजीकरण व प्रसार करणे आणि सामाजिक उपयोग वाढविणे हे आहे.

3. सर्वांगीण विकास :

NEP 2020 मध्ये विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिक विकास न पाहता शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, नैतिक व सर्जनशील विकासावर भर देण्यात आला आहे.

4. मूल्यशिक्षण :

सहानुभूती, इतरांचा आदर, जबाबदारी, समानता, न्याय, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये व संवैधानिक कर्तव्याची जाणीव यांसारख्या मूल्यांना शिक्षणात महत्त्व देण्यात आले आहे.

5. शिक्षकांचे महत्त्व :

शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास, प्रशिक्षण व अध्यापनातील नव्या पद्धतींचा वापर यावर NEP 2020 भर देते. मंत्रालयाच्या माहितीनुसार, शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी दरवर्षी 50 तासांच्या CPD (Continuous Professional Development) ची शिफारस करण्यात आली आहे.

6. कौशल्याधारित शिक्षण :

भारतीय ज्ञान परंपरेमध्ये प्रत्येक कौशल्याला महत्त्व होते. आधुनिक शिक्षणामध्येही विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा-केंद्रित न ठेवता कौशल्याधारित शिक्षण देण्यावर NEP 2020 मध्ये भर आहे.

7. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर :

डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरेतील ग्रंथ, हस्तलिखिते, लोकपरंपरा, भाषा व सांस्कृतिक वारसा जतन करणे शक्य आहे. NEP 2020 च्या अंमलबजावणीमध्ये DIKSHA, डिजिटल शिक्षण साहित्य, ऑनलाइन साधने व तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देण्यात आला आहे.

अशा प्रकारे, भारतीय ज्ञान परंपरेतील मूल्ये, भाषा, कौशल्ये, संस्कृती आणि ज्ञान यांचा आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधनाशी समन्वय साधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणे हा भारतीय ज्ञान परंपरा आणि NEP 2020 यांच्यातील महत्त्वाचा संबंध आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय भाषांना महत्त्व देत अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसह जवळपास सर्वच अभ्यासक्रमांमध्ये भारतीय भाषेचा पर्याय ठेवण्यात आला आहे. या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून प्रत्येक मुलांच्या विशिष्ट क्षमतांचा स्वीकार, ओळख व विकास यासाठी शिक्षक व पालकांना संवेदनशील करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शैक्षणिक आणि इतर क्षमतांच्या सर्वांगीण विकासावर पूर्ण भर दिला जातो. मुलांमध्ये साक्षरता व संख्याशास्त्र यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे, ज्यामुळे नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी सर्जनशील आणि तार्किक विचारांना चालना दिली जाऊ शकते.

Research Hub International Journal

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बहुविद्याशाखीय विद्यापीठांची स्थापना आणि अंतर्विद्याशाखीय संशोधनाला प्राधान्य राहील. उच्च शिक्षणात तीन प्रकारच्या संस्था असतील, संशोधन करणारी विद्यापीठे, अध्यापन करणारी विद्यापीठे व स्वायत्त पदवी देणारी महाविद्यालये. पदवी प्राप्त करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्यात येणार असून त्यात एक वर्ष पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र, दोन वर्षांनी पदविका व तीन वर्षांनी पदवी दिली जाणार आहे. चार वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एक वर्षानंतर पदव्युत्तर पदवी दिली जाईल. 2040 पर्यंत सर्व विद्यमान उच्च शिक्षण संस्था स्वतःला बहुविषयीय संस्था म्हणून स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवतील.

प्रत्येक विद्यार्थ्याला ज्ञान-केंद्रित भारतीय मूल्यांमधून विकसित दर्जेदार शिक्षण देणे हे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे उद्दिष्ट आहे. हे भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवू शकेल. आमचा अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या मूलभूत जबाबदाऱ्या व घटनात्मक मूल्ये रुजवतानाच बदलत्या जगात नागरिकांची भूमिका आणि जबाबदाऱ्यांविषयी जागरूकता निर्माण करेल, अशी या धोरणाची कल्पना आहे. भारतीय ज्ञान परंपरांच्या माध्यमातून भारत देश अधिक समाजाभिमुख होऊन सर्वोच्च गौरवशाली राष्ट्र बनेल.

निष्कर्ष :

भारतीय ज्ञान परंपरा अनेक वर्षांपासून चालत आलेली आहे किंवा विश्वाच्या आरंभापासूनच चालत आली आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. प्राचीन ऋषिमुनी कोणतेही काम विचारपूर्वक करीत असत. त्यांचे संशोधनकार्य आजच्या तुलनेत अनेक पटीने चांगले होते. मग ते आयुर्वेद क्षेत्र असो वा विज्ञान. बदलत्या जगात प्रत्येक जण बदलतो आणि आपणही त्याचे बळी ठरलो आहोत. हळूहळू जीवनपद्धती बदलत गेल्या आणि आमची अधोगती होत गेली. इंग्रज भारतात आल्यानंतर शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले. त्यात संशोधनाचाही समावेश होता. ऋषिमुनींच्या संशोधन पद्धती जरी पूर्वीपासून असल्या तरी आजच्या काळात त्या क्वचितच पाहायला मिळतात. संशोधन हा भारतीय ज्ञान परंपरेतील एक अंगभूत घटक आहे आणि अनेक तत्त्वे प्राचीन साहित्यात आढळतात, जी तत्कालीन संशोधनाला पुष्टी देतात.

प्राचीन काळी नालंदा, तक्षशिला अशी जागतिक स्तरावर वाखाणली गेलेली विद्यापीठे भारतात होती. बख्तियार खिल्जीने नालंदा विद्यापीठात शिकणारे हजारो विद्यार्थी, संस्कृत विद्वान आणि गुरुकुल नष्ट केले. आक्रमकांनी तक्षशिला नष्ट केली आणि ग्रंथालये जाळली. असंख्य संस्कृत ग्रंथ नष्ट केले. या विद्यापीठांमध्ये भारतीय ज्ञान परंपरा वैज्ञानिक पद्धतीनुसार अभ्यासल्या जायच्या. ही विद्यापीठे योग व आयुर्वेद विज्ञानाची केंद्रे होती. या परंपरेतून भारताने नेहमीच जगाला आध्यात्मिक बंधुता, योग व आयुर्वेदाचे ज्ञान दिले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे प्राचीन व शाश्वत भारतीय ज्ञान व विचारांच्या समृद्ध परंपरेच्या आधारावर तयार करण्यात आले आहे. भारतीय विचार परंपरा व तत्त्वज्ञान, ज्ञान, शहाणपण व सत्याचा शोध हे नेहमी सर्वोच्च ध्येय मानले गेले आहे. प्राचीन भारतातील शिक्षणाची उद्दिष्टे ही सांसारिक जीवनाची तयारी म्हणून ज्ञान संपादन करणे असे नाही, तर संपूर्ण आत्मज्ञान व मुक्ती असे मानले जात असे. त्यांचा या धोरणात विचार करण्यात आला आहे. सहानुभूती, इतरांबद्दल आदर, सौजन्य, लोकशाही भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेचा आदर, वैज्ञानिक विचार, स्वातंत्र्य, जबाबदारी, समानता व न्याय ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे आहेत. विद्यार्थ्यांचे

सतत मूल्यांकन करण्यावर तसेच शक्य असेल तेथे तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जाईल.

एकंदरीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीतून भारतीय ज्ञान परंपरांच्या समृद्ध मार्गावर चालत नवी पिढी सर्वगुणसंपन्न व स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी तयार होईल.

संदर्भ ग्रंथ :

- भारतीय ज्ञान परंपरा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण — प्रदीप पवन मांडवकर, रिसर्च गेट. (SSRN Elibrabry)
- भारतीय ज्ञान परंपरा, राजनीति और राष्ट्रीय शिक्षा नीति, 2020 — लेखक : दिलीप सिंह बिष्ट, राघव पब्लिकेशन, दिल्ली.
- भारतीय ज्ञान प्रणाली, NEP 2020 — कविता खताळ, डॉ. खळदेकर, निराली प्रकाशन.
- राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 की गंगोत्री : भारतीय ज्ञान परंपरा — अनिल कुमार राय, प्रकाशक : किताब वाले.
- Indian Knowledge Systems and NEP 2020 — डॉ. ए. आर. सरवरकर, एडिशन पब्लिशिंग हाउस.

Research Hub International Journal